**<u>नियमित दिवाणी मुकदमा नं. १३९/२०१५</u>**
**<u>(बाळासो हिरगुडे वि. बाबासो हिरगुडे वगैरे )</u>**

**<u>नि.३८ खालील आदेश</u>**

प्रतिवादी नं.२ ने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ अन्वये वादीचे वारस अभिलेखावर घेणेसाठी केला आहे. प्रतिवादीतर्फे सदर अर्जास लेखी म्हणणे दाखल केले आहे.

२. प्रतिवादी नं. २ चे कथनानुसार प्रस्तुत दावेमधील वादी बाळासो शिविलिंग हिरगुडे हे दिनांक १५.१०.२०१५ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी नं. २ ही वादीची आई असुन ती मयत वादी बाळासो हिरगुडे यास वारस आहे. मयत वादी बाळासो हिरगुडे यांनी प्रस्तुत दावा तुटक वाटप होवून कब्जा मिळणेकरता व निरंतर ताकीदीकरता दाखल केलेला आहे. वादी हे जरी मयत झाले तरी प्रतिवादी नं. २ यांनीही त्यांचा हिस्सा तुटक वाटप होवून मिळणेची मागणी केलेली आहे. त्यामुळे मयत वादीचे नांव कमी करुन त्यांचे वारस प्रतिवादी नं. २ यांचे नांव वादी म्हणून नमुद करुन तशी दावेमध्ये दुरुस्त करणेस परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी सदर अर्जास हरकत घेवून अर्ज फेटाळणेची विनंती केली आहे.

४. निर्विवादप्रमाणे प्रस्तुतचा दावा वादीने दावा मिळकतीचे तुटक वाटप होवून कब्जा मिळणेसाठी व निरंतर ताकीदीकरता केलेला आहे. प्रतिवादी नं. २ ही वादीची आई आहे. वादी दिनांक १५.१०.२०१५ रोजी मयत झालेला आहे. त्याचे मृत्यू प्रमाणपत्र नि.४१/१ कडे दाखल केले आहे. प्रतिवादी नं. २ ही वादीची आई असून तिनेही प्रस्तुत दावेचे कामी तिचा हिस्सा तुटक वाटप होवून मिळणेची मागणी केली आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी नं. २ ची मागणी सारखीच आहे. प्रस्तुतचा दावा अद्यापी प्राथमिक स्तरावर प्रलंबित आहे. तसेच प्रतिवादी नं. २ सदरचा अर्ज मुदतीत दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये दाव्याचे स्वरुप व अर्जात नमुद केलेली हकीकत लक्षात घेता माझ्या मते दाव्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय होणेसाठी मयत वादीचे नांव कमी करुन त्याचे वारस प्रतिवादी नं. २ चे नांव वादी म्हणून नमुद करुन तशी दावेमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक

आहे.   अशी दुरुस्ती केलयामुळे  माझ्या मते प्रतिवादी पक्षावरती फारसा अन्याय होणार नाही. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादी नं. २ चा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी नं. २ ने वादीचे नांव कमी करुन वरस म्हणून  त्या जागी तिचे नांव वादी म्हणून नमुद करुन तशी दुरुस्ती दावेमध्ये करुन दुरुस्त दाव्याची प्रत त्वरीत दाखल करावी.

सही/–१२.१.१६

मिरज.

(एस. एस. पाटील )

दिनांकः  १२.०१.२०१६

२रे सह–दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मिरज.